# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सभा दिनांक ०७/०८/२०२३

---

## कार्यवृत्त

आज दिनांक ०७/०८/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम, आरोग्य, पाणी पुरवठा तथा विधी व कामगार व शिक्षण विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र | विषय |
|---|---|
| | **बांधकाम विभाग** |
| १ | मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत न.प. हद्दीतील गोपाल मालपाणी यांचे घरापासून ते ओमप्रकाश रावत यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्त्याचे कामा करिता सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणे बाबत |
| २ | मलकापूर शहरात महिलांकरिता स्वच्छतागृहांचे बांधकाम करणे बाबत. |
| ३ | बि. जे. टी. आय. रोड ते प्रशांत नगर गार्डन पर्यंत नाली बांधकाम करणे बाबत. |
| ४ | मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्र. ३ येथे सोनुने यांचे घरापासून ते श्री योगेश पोपे यांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण करणे |
| | **पाणी पुरवठा विभाग** |
| ५ | बिर्ला कॉलनी व मराठा मंगल कार्यालय परिसरात पाईपलाईन टाकण्या बाबत |
| | **आरोग्य विभाग** |
| ६ | मलकापूर न.प. मालकीची रुग्णवाहिका चालविणे व देखभाल करणे बाबतच्या कामास मुदतवाढ देणे व देयक प्रदान करण्यास मान्यता देणेबाबत. |
| ७ | मलकापूर शहरातील F.R.P. मुत्री घरांना टँकरद्वारे पाणी पुरवणे बाबतच्या कामास दिलेल्या मुदतवाढसाठीचे देयक प्रदान करण्यास मान्यता देणेबाबत. |
| | **विधी व कामगार विभाग** |
| ८ | वि. उच्च न्यायालय नागपूर व दिवाणी न्यायालय मलकापूर येथे सुरू असलेल्या मलकापूर नगर परिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या प्रकरणाबाबत |
| | **शिक्षण विभाग** |
| ९ | मलकापूर न.प. प्राथमिक शिक्षण विभागात शिक्षण लिपिक या रिक्त पदावर संदेश मोहन देशमुख यांची सेवा वर्ग करणे बाबत. |

**विषय क्र.१ :- मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत न.प. हद्दीतील गोपाल मालपाणी यांचे घरापासून ते ओमप्रकाश रावत यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्त्याचे कामा करिता सुरक्षा अनामत रक्कम परत मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता तसेच लेखापाल यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत न.प. हद्दीतील गोपाल मालपाणी यांचे घरापासून ते ओमप्रकाश रावत यांचे घरापर्यंत काँक्रीट रस्त्याचे काम पूर्ण झाले असून सदर कामासाठी राखीव असलेली सुरक्षा अनामत रक्कम रु. ५५,९४१/- परत मिळणे बाबत सदर कामाचे कंत्राटदार रजा उल्ला खान जिया उल्ला खान यांनी अर्ज सादर केला असल्याचे नमूद केले आहे. सदरचे काम हे बरेच जुने असून सुस्थितीत आहे. तरी सदर कामाची सुरक्षा अनामत रक्कम परत देण्यास ही सभा मंजुरात देत आहे.

**विषय क्र.२ :- मलकापूर शहरात महिलांकरिता स्वच्छतागृहांचे बांधकाम करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. उपायुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांचे पत्र क्र. नप्रसं/का-११/2023/मअस्व/४०१२ दि. १९ जुलै २०२३ यांचे पत्रानुसार मा. अध्यक्षा महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांनी राज्यातील महिलांच्या आरोग्या करिता ठराविक अंतरावर महिलांकरिता स्वच्छतागृहे असणे ती स्वच्छ आणि सुरक्षित, सुस्थितीत असणे स्वच्छतागृहामध्ये भरपूर पाणी असणे व स्वच्छतागृहामध्ये स्वच्छतेबाबत आवश्यक ती कार्यवाही तातडीने करणे बाबत नमूद करून केलेल्या कार्यवाही बाबतचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करणे बाबत कळविले आहे.

सदर पत्रानुसार कार्यवाही करणे करिता मलकापूर न.प.हद्दीतील तहसील चौक व इतर आवश्यक ठिकाणी उपलब्ध जागेनुसार महिलांकरिता स्वच्छतागृह बांधण्याबाबतच्या कार्यवाहीस व येणारा खर्च नगरपरिषद निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.३ :- बि. जे. टी. आय. रोड ते प्रशांत नगर गार्डन पर्यंत नाली बांधकाम करणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार न.प. हद्दीतील बी. जे. टी. आय. रोड ते प्रशांतनगर गार्डन पर्यंत पाणी वाहून जाण्याकरिता नालीचे बांधकाम केले नसल्यामुळे पावसाळ्याचे दिवसात त्या भागात पाणी साचून राहते. त्यामुळे आजूबाजूच्या रहिवाशांना त्रास होत असून याबाबत नागरिकांच्या तोंडी तक्रारी सुद्धा प्राप्त होत असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार बी. जे. टी. आय. रोड ते प्रशांतनगर गार्डन पर्यंत नालीचे बांधकाम करण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च न.प. निधी मधून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.४ :- मा. आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत प्रभाग क्र. ३ येथे सोनुने यांचे घरापासून ते श्री योगेश पोपे यांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण करणे.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. जिल्हा नियोजन अधिकारी जिल्हा नियोजन समिती बुलढाणा यांचे पत्र क्र. O/2023/Aug/ECL/00370 दि. ०२/०८/२०२३ नुसार मा. आमदार श्री राजेश पंडितराव एकडे विधानसभा सदस्य यांनी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत प्रस्तावित केलेला कामाचे अंदाजपत्रक सादर करण्याबाबत कळविले असल्याचे नमूद केलेले आहे. त्यानुसार प्रस्तावित केलेली कामे खालील प्रमाणे

१) न.प. मलकापूर हद्दीतील प्रभाग क्र ३ येथे सोनुने यांचे घरापासून ते श्री योगेश पोपे यांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण करणे.

उपरोक्त कामाचा प्रस्ताव संबंधित विभागाकडे सादर करण्यास व सदर काम आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.५ :- बिर्ला कॉलनी व मराठा मंगल कार्यालय परिसरात पाईपलाईन टाकण्या बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून पा.पु. अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मलकापूर न.प. हद्दीतील बिर्ला कॉलनी व मराठा मंगल कार्यालय परिसरात मोठ्या प्रमाणात वस्ती झालेली असून बिर्ला कॉलनीतील काही नागरिकांनी प्रशांतनगर वरून नळ कनेक्शन घेतलेले असून त्यामुळे त्यांना पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याने त्यांच्या मोठ्या प्रमाणात मौखिक तक्रारी प्राप्त होत असल्याचे नमूद केलेले आहे. या भागात राहणाऱ्या नागरिकांची पाईपलाईन टाकण्याबाबतची मागणी सुद्धा प्राप्त झालेली आहे. सदर भागाची पाहणी केली असता या भागात पाईपलाईन नाही त्यामुळे पाईपलाईन टाकल्यास न.प.चा उत्पन्नाचा स्त्रोतही वाढणार असल्याचे पा.पु. अभियंता यांनी नमूद केलेले आहे.

ठरविण्यात येते की पा.पु. अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार बिर्ला कॉलनी व मराठा मंगल कार्यालय परिसरात नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कार्यवाहीस व येणारा खर्च १५ वा वित्त आयोग निधी, वैशिष्ट्यपूर्ण निधी, आमदार/ खासदार निधी, न.प. निधी किंवा इतर उपलब्ध निधीमधून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.६ :- मलकापूर न.प. मालकीची रुग्णवाहिका चालविणे व देखभाल करणे बाबतच्या कामास मुदतवाढ देणे व देयक प्रदान करण्यास मान्यता देणेबाबत.**

नगरपरिषद मलकापूर द्वारे सन २०२२-२३ साठी न.प. ची रुग्णवाहिका चालविणे व तिची देखभाल करणे या कामाचा कंत्राट श्री प्रमोद सुखदेव राखुंडे, मलकापूर यांना देण्यात आला होता. तरी सदर कामाची मुदत हि दि. ३१ मार्च २०२३ रोजी संपल्याने सन २०२३-२४ करिता सदर कामासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यास न.प. ची प्रशासकीय सभा दि. २३/०२/२०२३ रोजी च्या ठराव क्र. १० नुसार मान्यता मिळाली आहे. परंतु, मा. मुख्याधिकारी साहेब यांनी सदर काम वैयक्तिक कंत्राटदाराला न देता कोणत्याही सेवाभावी संस्थेला देण्यात यावे असे आदेश दिलेले आहे. करिता सदर कामाची फेरनिविदा प्रक्रिया करणे गरजेचे आहे. तरी फेरनिविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सन २०२२-३ चे कंत्राटदार श्री प्रमोद सुखदेव राखुंडे मलकापूर यांना सदर कामासाठी सर्व शर्ती व अटींना अधीन राहून मुदतवाढ देण्यास व दिलेल्या मुदत वाढीच्या कामासाठीचे देयक प्रदान करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.७ :- मलकापूर शहरातील F.R.P. मुत्री घरांना टँकरद्वारे पाणी पुरवणे बाबतच्या कामास दिलेल्या मुदतवाढसाठीचे देयक प्रदान करण्यास मान्यता देणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून प्र. आरोग्य निरीक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मलकापूर न.प. हद्दीतील विविध ठिकाणी ठेवण्यात आलेल्या F.R.P. मुत्री घरांना स्वच्छतेसाठी टँकरद्वारे पाणी पुरविणे या कामाचे सन २०२२-२३ करिता कंत्राट श्री निलेश रामभाऊ चोपडे मलकापूर यांना देण्यात आला होता. तसेच सन २०२३-२४ करिता सदर कामासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सन २०२२-२३ चे कंत्राटदार श्री निलेश रामभाऊ चोपडे मलकापूर यांना दि. ०१ एप्रिल २०२३ ते २३ मे २०२३ पर्यंत मुदतवाढ आदेश देण्यात आला होता. त्यानुसार कंत्राटदार यांनी दि. ०१/०४/२०२३ ते २३/०५/२०२३ पर्यंत एकूण १५९ ट्रिप टँकरद्वारे पाणीपुरवठा केला आहे व त्याबाबतचे देयक प्रति ट्रीप ३१०.०० रुपये प्रमाणे १५९ ट्रिपचे एकूण असे ४९,२९०/- रुपये प्रदान करणेबाबत सादर केले आहे.

त्यानुसार सन २०२२-२३ चे कंत्राटदार श्री निलेश रामभाऊ चोपडे यांना सन २०२३-२४ करिता दि. ०१/०४/२०२३ ते २३/०५/२०२३ पर्यंत दिलेल्या मुदत वाढीच्या कामासाठीचे देयक अदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र.८ :- वि. उच्च न्यायालय नागपूर व दिवाणी न्यायालय मलकापूर येथे सुरू असलेल्या मलकापूर नगर परिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या प्रकरणाबाबत.**

मलकापूर नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाबाबत दाखल असलेल्या याचिका व त्या संबंधित वि. उच्च न्यायालय नागपूर यांनी पारित केलेल्या निर्णयानुसार मलकापूर नगरपरिषदेला सदर कामातील कंत्राटदार यांना रुपये २.५१७६६५० कोटी रक्कम अदा करण्यास Arbitration लवादाने निर्देश केले असून सदर प्रकरणातील वादी कंत्राटदार यांनी मा. दिवाणी न्यायालय मलकापूर येथे सदर थकीत देयक व्याजासह मिळणे बाबत व नगरपरिषदेच्या मालकीची मौजे मलकापूर येथील सर्वे नं २५२/२ क्षेत्रफळ ०.७६ हे. हि जागा जप्त करण्याबाबत अर्ज केला आहे. सद्यस्थितीत संस्थेमध्ये नगरपरिषद विसर्जित झालेली असल्याने मलकापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अध्यक्षपदी प्रशासक यांची नियुक्ती झालेली आहे. तसेच सदर रक्कम देण्यासंबंधी कुठलाही निधी नगरपालिकेकडे नाही अथवा शासनाकडून आजपर्यंत उपलब्ध झालेला नसल्याने मलकापूर न.प. ची आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे. त्यामुळे भविष्यात सदर प्रकरणात जर नगरपरिषद मलकापूर विरोधात निर्णय लागला तर नगरपरिषदेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊ शकते.

त्यामुळे सदर रक्कम नगर परिषदेला देणे शक्य नसल्याने व मालमत्तेची जप्ती न होण्याकरिता मा. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्य शासनाकडे संबंधित प्रकरणी निधी मागण्याकरिता प्रस्ताव पाठविण्यास ही सभा मंजुरात देत आहे.

**विषय क्र.९ :- मलकापूर न.प. प्राथमिक शिक्षण विभागात शिक्षण लिपिक या रिक्त पदावर संदेश मोहन देशमुख यांची सेवा वर्ग करणे बाबत.**

मलकापूर नगरपरिषद अधिनस्त न.प. प्राथमिक शिक्षण विभागात कनिष्ठ लिपिक या रिक्त पदावर संदेश मोहन देशमुख हे दिनांक ०१ जुलै 2023 रोजी रुजू झालेले आहे. तरी शिक्षण लिपिक या पदावर न.प. आस्थापनेवरून सेवा वर्ग करण्यासाठी मा. शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांना प्रस्ताव पाठविणे गरजेचे आहे. तरी मा. शिक्षण उपसंचालक अमरावती विभाग अमरावती यांना सदर बाबतीत प्रस्ताव पाठवण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**आर यु सुरडकर**
**प्रशासक**
**नगरपरिषद मलकापूर**